15-04-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 04/14/2025 11:15 PM Page 1



# उद्घाटनापूर्वीच मडगाव घाऊक मासळी बाजार समस्यांच्या विळख्यात

## मार्केट पुनर्विकासाच्या प्रयत्नांवर प्रश्नचिन्ह उपस्थित

■ टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव, दि. १४ :** मडगाव घाऊक मासळी बाजाराचे औपचारिक उद्घाटन होण्यास अवघे दोन आठवडे शिल्लक असतानाच, या ठिकाणावरील सततच्या समस्यांमुळे चिंता वाढली आहे. बाजारातील विविध सुधारणा आणि पायाभूत सुविधांमध्ये झालेले बदल, तसेच अस्वच्छता आणि बेकायदेशीर व्यापाराच्या समस्यांमुळे मार्केट पुनर्विकासाच्या प्रयत्नांवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

मार्केट आधुनिकीकरणासाठी सुरू केलेल्या पुनर्बांधणी प्रकल्पात नव्या फरश्या, सुधारित ड्रेनेज सिस्टम, कचरा टाकणाऱ्या स्थानांची व्यवस्था आणि इतर आवश्यक पायाभूत सुविधांचा समावेश आहे. तथापि, मासे विक्रेते आणि स्थानिक रहिवाशांनी दिलेल्या तक्रारींनुसार, मार्केट परिसरात खराब स्वच्छतेचे आणि बेकायदेशीर व्यापाराचे दृश्य कायम आहे. मासे विक्रेते आणि स्थानिक रहिवाशांचे म्हणणे आहे की, बाजारातील परिसर माशांच्या कचऱ्याने, प्लास्टिक पॅकेजिंगने आणि साचलेल्या पाण्याने भरलेला आहे. यामुळे पर्यावरणीय धोक्यांसोबतच आरोग्याच्या समस्यांनाही चालना मिळत आहे.

मार्केटची नवी इमारत आकर्षक आहे, परंतु दुर्गंधी, माश्या आणि घाण अजूनही तशीच आहे,तुम्ही येथे गर्दीच्या वेळी आल्यास सर्वत्र कचरा पडलेला दिसतो असे बाजारात काम करणारे एक व्यापारी फ्रान्सिस्को फर्नांडिस म्हणाले.

अनेक विक्रेत्यांच्या मते, कचरा व्यवस्थापनाची प्रणाली अजूनही अकार्यक्षम आहे. महानगरपालिकेचे कचरा ट्रक वेळेवर येत नाहीत आणि दररोज व्यापारादरम्यान निर्माण होणारा कचरा वेळेवर उचलला जात नाही.

याशिवाय, बाजारात आणखी एक महत्त्वाची समस्या म्हणजे अनधिकृत विक्रेत्यांची उपस्थिती. या विक्रेत्यांनी बाजाराच्या बाहेर रस्त्यावर स्टॉल्स लावले असून, फळे, कपडे आणि इतर वस्तू विकत आहेत. यामुळे कायदेशीर व्यापाऱ्यांना अन्याय होतो आहे.हे असुरक्षित आणि अराजक आहे. या प्रकारच्या अनधिकृत क्रियाकलापामुळे बाजाराची कार्यक्षमता कमी होत आहे, असे फातिमा बॅरेटो, एक नोंदणीकृत व्यापारी म्हणाल्या.

वारंवार तक्रारी करूनही, मडगाव नगर परिषदेकडून अंमलबजावणी करण्यात येत नसल्याचा आरोप आहे. आम्ही या समस्यांबद्दल पालिका अधिकाऱ्यांना वारंवार सांगितले आहे, परंतु गंभीर कारवाई करण्यास कोणीही तयार नाही, असे बॅरेटो पुढे म्हणाल्या.

प्रवाशांनीही बाजाराच्या परिसरात होणाऱ्या अस्वच्छतेबद्दल ,आणि वाहतूक कोंडीबद्दल चिंता व्यक्त केली आहे. नूतनीकरणानंतरही, बाजाराभोवतीचे रस्ते हातगाड्या आणि कचऱ्याने भरलेले असतात. पावसाळ्यात जर यावर लक्ष दिले नाही तर परिस्थिती आणखी वाईट होईल, असे रीना डिसोझा, एक स्थानिक रहिवासी म्हणाल्या.सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञांनी इशारा दिला आहे की ठोस कचरा व्यवस्थापन योजना आणि परवाना नियमांची अंमलबजावणी न केल्यास, बाजार पर्यावरणीय आणि सार्वजनिक आरोग्याच्या समस्यांचे केंद्र बनू शकतो.

पालिकेच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर स्वीकारले की, भौतिक सुधारणा पूर्ण झाल्या आहेत, तरीही कार्यप्रणालीतील समस्या दूर करणे आवश्यक आहे. उद्घाटनापूर्वी काही त्रुटी आहेत ज्या दूर करणे आवश्यक आहे. आम्ही स्वच्छता आणि कायदा अंमलबजावणी पथकांशी समन्वय साधत आहोत, असे अधिकाऱ्याने सांगितले.तथापि, अद्याप कोणताही सविस्तर कृती आराखडा जाहीर करण्यात आलेला नाही आणि स्थानिक नेते अधिकारींना परिस्थिती तातडीने हाताळण्याची मागणी करत आहेत.

## निवडक

### नावेली येथे १९ रोजी भजनी स्पर्धा

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १४ :** श्री स्वामी समर्थ मंदिर फणसवाडी नावेली येथे स्थापना उत्सव निमित्ताने शनिवारी दि. १९ रोजी दुपारी ३.३० वाजता महिला भजन स्पर्धा आयोजित केली आहे. नावनोंदणी साठी पहिले १० स्पर्धक घेतले जातील. नाव नोंदणी शेवटची तारीख १७ एप्रिल असेल. स्पर्धकांनी ३.३० वाजता येऊन चिठ्ठी काढून आपल्या आलेल्या नंबरवर आपले सादरीकरण बंधनकारक असेल. ठीक ४ वाजता भजन सुरुवात होईल. नावनोंदणी साठी संपर्क – ९७६२३३११६१, व्हॉट्सअॅप – ९४२३८१२०९८ साधावा. प्रत्येक ग्रुपसाठी वेळ ३० मिनिटांची असेल यामध्ये भजन सुरुवात, १ अभंग, गजर व १ गवळण सादर केलेली असावी. स्पर्धक गटाला प्रत्येकी मानधन रु. ५०००, पहिले ३ विजेते सोडून, पहिले बक्षीस रु. २५०००, दुसरे रु. २००००, तिसरे रु. १५०००, उत्कृष्ट महिला गायक रु. ५०००, उत्कृष्ट महिला मृदंग/तबलावादक रु. ५०००, उत्कृष्ट महिला संवादिनी वादक रु. ५००० परीक्षकांचा निर्णय अंतिम असेल.

---

### हरमल येथे आज स्वामी समर्थ पादुका, मूर्तीचे आगमन, गायन कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १४ :** बेती श्री स्वामी समर्थ मठ नूतन मूर्ती व पादुकाचे मिरवणूक सोमवार दि. १४ ते २१ रोजी पर्यंत पेडणे, बारदेष तालुक्यात होणार असून, मूर्ती स्थापना, गुरुवार २२ ते २६ पर्यंत स्थापना सोहळा, बेती बार्देश येथे होणार असल्याचे समजते. दरम्यान,नूतन मूर्ती व पादुकाचे आगमन मंगळवार १५ रोजी संध्याकाळी ७ वाजता खालचावाडा श्री नारायण देव मंदिरात, आगमन व वास्तव्य असल्याचे देवस्थान समितीचे अध्यक्ष राजेश गोकर्णकर यांनी कळविले आहे. त्यानिमित्त मुख्य रस्त्यापासून ते श्री नारायण देव मंदिरापर्यंत, श्री नारायण देव महिला मंडळातर्फे दिंडी कार्यक्रम व फुलांचा वर्षाव करण्यात येईल. त्यानंतर रात्री ९ वाजता प्रसिद्ध गायक शुभम नाईक यांचा गायनाचा कार्यक्रम होईल, असे अध्यक्ष राजेश गोकर्णकर यांनी सांगितले.

---

### श्रीमती कमलाबाई हेदे विद्यालयात उन्हाळी शिबिराचे आयोजन

■ टीम दैनिक हेराल्ड

**बोरी, दि. १४ :** काराय शिरोड्याच्या कमलाबाई हेदे विद्यालयात दरवर्षीप्रमाणे यंदाही उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबिर मुख्यत: दोन गटात प्राथमिक व पूर्वप्राथमिक विद्यार्थ्यांसाठी आयोजित केले होते. ह्यात प्रामुख्याने नृत्य, गायन, चित्रकला, पर्णकला, पेपरबॅग(कागद)वनवणे, स्टोन पेंटीग, हस्तकला, चित्रपट दर्शन, टाकाऊतून टिकाऊ तसेच टिश्श्यू फॅक्टरीला भेट अशा विविध उपक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे नियोजन पूर्व प्राथमिक तसेच प्राथमिक शिक्षकांनी केले. काही संसाधन व्यक्तिंचे मार्गदर्शन सुध्दा लाभले. दहा दिवसांच्या ह्या शिबिरातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळाला. शिबिराला पालक आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.सदर उपक्रमाचे व्यवस्थापक माजी मुख्याध्यापक चंद्रकांत हेदे यांनी स्वागत केले आहे,अश्या प्रकारच्या कार्यक्रमाना शिक्षक व पालकांनी सहकार्य करावे असे आवाहन केले.

---

### कणकेश्वरी शांतादुर्गा संस्थानतर्फे नूतन मूर्ती पुनःप्राण प्रतिष्ठापनेचा १८ पासून महोत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १४ :** नार्वे येथील श्री कणकेश्वरी शांतादुर्गा पंचायतन संस्थान गावकर वाडा नार्वे येथे नूतन मूर्ती पुनः प्राणप्रतिष्ठापना महोत्सव शुक्रवार दि. १८ शनिवार दि. १९ आणि रविवार दि. २० रोजी असे तीन दिवस संपन्न होणार असून त्यानिमित्त भव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती देवस्थानचे अध्यक्ष गुरुदास नार्वेकर व पदाधीकाऱ्यांनी दिली.

शुक्रवार दि. १८ रोजी सकाळपासून धार्मिक विधी सकाळी साडेदहा वाजता सुवासिनी कडून नूतन मूर्ती गंगा स्नान विधी (जलाधिवास) दुपारी महाप्रसाद होईल. सायंकाळी सात वाजता ह भ प हर्षद श्रीनिवास जोगळेकर पुणे यांचे कीर्तन त्यानंतर शांतादुर्गा भजनी मंडळ कारापूर यांचा भजन चा कार्यक्रम.दि. १९ रोजी सकाळी पासून धार्मिक विधी, प्राकार शुद्धी व इतर धार्मिक विधी दुपारी महाप्रसाद. रात्री ८ वाजता बाळूमा मा हे नाटक होईल.

रविवार दि. २० एप्रिल रोजी नूतन मूर्ती पुनःप्राण प्रतिष्ठापना विधी सकाळी आठ वाजता विविध धार्मिक विधी. तसेच सकाळी ११ वाजून ३० मिनिटांनी शुभमुहूर्तावर देव प्रतिष्ठा मूर्ती स्थापना, तत्त्वज्ञास, स्थापना मूर्तीची महापूजा, पुजांग होम बलिदान, पूर्णा हुती, विभूती वंदन होईल.तसेच श्री शांतादुर्गा देवीचा नववा वर्धापन दिवसानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम दुपारी महाप्रसादहोईल. तसेच रात्री बाळ चिल्लया हे नाटक सादर होईल.

या तीन दिवस या उत्सवात भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन देवस्थान समितीचे गुरुदास नार्वेकर व देवस्थान समिती पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# ओल्ड गोवा जागतिक वारसा स्थळाच्या बफर झोनमध्ये वाढ

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १४ :** ओल्ड गोवा येथील ऐतिहासिक चर्च संकुलाभोवती कोणत्याही प्रकारचे बांधकाम करण्यास परवानगी दिली जाणार नसल्याचे स्पष्ट करत, गोवा सरकारने युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळाभोवतीच्या बफर झोनमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी १०० मीटर असलेला बफर झोन आता २०० मीटरपर्यंत वाढविण्यात आला आहे.

नगर नियोजन (टीसीपी) मंत्री विश्वजित राणे यांनी रविवारी खोर्ली येथे एका कार्यक्रमानंतर पत्रकारांशी संवाद साधताना ही माहिती दिली. वारसा स्थळांचे संवर्धन करणे ही आपली जबाबदारी आहे. त्यामुळे बफर झोन आवश्यकच आहे. मात्र, या झोनमध्ये कोणतेही काम करण्याची प्रक्रिया कायद्यानुसार पार पाडली गेली असल्यास ती बाब वेगळी असेल, असे राणे म्हणाले.

मी टीसीपी मंत्री होण्यापूर्वी या भागाची अधिसूचना झाली नव्हती. सध्या ती प्रक्रिया पूर्ण झाली आहे. आमचे उद्दिष्ट वारसा स्थळांचे आणि निसर्गसंपत्तीचे जसे की खारफुटीचे संरक्षण करणे हे आहे. आमदार राजेश फळदेसाई यांच्या पुढाकारानेच हा मुद्दा मंडळासमोर मांडण्यात आला आणि त्यावर ठोस निर्णय घेण्यात आला, असेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, सेव्ह ओल्ड गोवा ॲक्शन कमिटीने या निर्णयावर मिश्र प्रतिक्रिया व्यक्त करत सरकारवर टीका केली आहे. समितीचे समन्वयक पीटर व्हिएगस यांनी सांगितले की, ओल्ड गोवा येथील जागतिक वारसा स्थळ हे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण अंतर्गत येते. त्यामुळे राज्य सरकारच्या अधिकारक्षेत्राबाबत स्पष्टता आवश्यक आहे. जर सरकार खरोखरच ठाम असेल, तर हा परिसर प्रादेशिक आराखडा २०२१ मध्ये समाविष्ट का केला नाही ? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

व्हिएगस यांनी यावर प्रश्न उपस्थित करत सांगितले की, सीमांकन हे केवळ आरपी २०२१ नुसारच केले जाईल. केवळ घोषणा करून कोणताही उद्देश सफल होणार नाही. सरकारचा दृष्टिकोन आणि टीसीपी विभाग वारसा स्थळांशी कसा वागतो, याचे हे प्रतिबिंब आहे.

गेल्या महिन्यात, कार्यकर्त्यांनी दिलेल्या तीव्र आंदोलनानंतर गोवा सरकारने जुन्या गोव्यातील पर्यटन सुविधा केंद्राच्या कामकाजावर तात्पुरती स्थगिती दिली होती. हा मुद्दा राज्य विधीमंडळातही गाजला होता. यावेळी पर्यटन मंत्री रोहन खंवते यांनी स्पष्ट केले होते की, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण आणि चर्च प्रशासनाची मान्यता मिळेपर्यंत कोणतेही काम सुरू केले जाणार नाही.

# ग्रामीण स्वयंरोजगाराला नवसंजीवनी देण्याचा प्रयत्न

■ टीम दैनिक हेराल्ड

**सांगे, दि. १४ :** कृषी संचालनालयाने सांगे तालुक्यातील नारळ तोडणाऱ्यांच्या हरवलेल्या उपजीविकेला पुनरुज्जीवित करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरू केले आहेत. पारंपारिक व्यवसाय आणि ग्रामीण स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी कौशल्य विकास आणि आधुनिक उपकरणांच्या मोफत उपलब्धतेद्वारे या क्षेत्रात नवा आकार देण्यात येत आहे.

विभागीय कृषी अधिकारी अग्रेश शिरोडकर यांच्या पुढाकाराने, 'फ्रेंड्स ऑफ कोकोनट ट्री' या उपक्रमाअंतर्गत सात दिवसांचा विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात नारळ तोडण्याच्या आधुनिक तंत्रांवर व्यक्तींना प्रशिक्षण दिले गेले, ज्यात अनेक पारंपारिक व्यवसायिकांना प्रशिक्षणाचा लाभ मिळाला. यामध्ये सहभागी झालेल्या अनेक व्यक्तींनी पूर्वी आपला व्यवसाय सोडला होता. त्यांना आवश्यक उपकरणेही मोफत प्रदान करण्यात आली.

याबाबत माहिती देताना शिरोडकर यांनी सांगितले की, या योजनेअंतर्गत ८ ते १० दिवसांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाते. यामध्ये व्यावहारिक गिर्यारोहण सत्रे, नारळाच्या झाडाची काळजी, रोग व्यवस्थापन आणि नारळाच्या मूल्यवर्धनासाठी शैक्षणिक मॉड्यूल्सचा समावेश आहे. त्यांनी स्थानिक तरुणांना या प्रकारच्या कौशल्य विकास कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेचे एक उदाहरण म्हणजे सांगे तालुक्यातील काष्टी येथील बोमो वरक. एकेकाळी बेरोजगार असलेला बोमो, शारीरिकदृष्ट्या शक्य नसल्यामुळे या व्यवसायापासून दूर होता. त्याने सांगितले की, पूर्वी, मशीनशिवाय काम करणे खूप वेळ घेणारे होते आणि लोकांनी आम्हाला फोन करणे बंद केले. पण प्रशिक्षण घेतल्यानंतर आणि क्लायंबिंग मशीन मिळाल्यानंतर माझी परिस्थिती बदलली आहे. बोमो आता दररोज १,००० ते १,५०० रुपये कमावतो आणि त्याच्या स्वावलंबनामुळे त्याला पुन्हा प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

एफओसीटी उपक्रम केवळ स्थानिक कामगारांना सक्षम करत नाही, तर गोव्यातील पारंपारिक व्यवसायांची आणि कौशल्यांची जपणूक करण्यासाठी महत्त्वाचा ठरतो. या कार्यक्रमामुळे गोव्यातील पारंपारिक नारळ तोडण्याच्या व्यवसायाची हानी टाळण्यात मदत होणार आहे. आतापर्यंत २५ व्यक्तींना या प्रशिक्षणाचा लाभ मिळाला आहे, आणि त्यातले बरेच जण आता स्वतःच्या मळ्यात आणि व्यवसायात नारळ तोडण्याचे कार्य करत आहेत.

अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, हे फक्त एक प्रारंभ आहे. भविष्यात आणखी प्रशिक्षण कार्यक्रम राज्यभर आयोजित करण्याची योजना आहे, ज्यामुळे स्थानिक रोजगाराला चालना मिळेल आणि बाह्य कामगारांवर असलेले अवलंबित्व कमी होईल.

# स्थानिकांची सुरक्षा व देखरेखीची नागरिकांची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १४ :** रायमधील एका स्थलांतरित कामगाराच्या हत्येची घटना नुकतीच घडली असून, यामुळे स्थानिक रहिवाशांमध्ये चिंता आणि असुरक्षतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेने गावात स्थलांतरितांच्या हालचालींवर कडक लक्ष ठेवण्याची मागणी जोर धरु लागली आहे.

दोन दिवसांपूर्वी घडलेल्या या घटनेत, एका पुरूष स्थलांतरित कामगाराला चाकूने वार करण्यात आले. पोलिसांनी तपास सुरू केला असून, त्यांना संशय आहे की, हत्येचा आरोपी देखील स्थलांतरित असावा. अधिक तपास व गुन्ह्याच्या हेतूचा शोध घेण्यासाठी पोलिस प्रयत्नशील आहेत. अधिकाऱ्यांनी ही घटना एक वेगळी बाब असल्याचे सांगितले असले तरी, रायमध्ये स्थलांतरित लोकसंख्येच्या नियमनाची आणि देखरेखीची समस्या पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. स्थानिक समुदायाने या संदर्भात चिंता व्यक्त केली आहे.

आम्ही स्थलांतरितांच्या विरोधात नाही, मात्र योग्य व्यवस्थापन आवश्यक आहे, असे स्थानिक रहिवासी क्रिस्टोफर डायस यांनी सांगितले. आमच्या गावात कोण राहत आहे, याची माहिती असणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. याआधीही, गावकऱ्यांनी पंचायत प्रशासनाकडे स्थलांतरित कामगारांसाठी नोंदणी प्रणाली सुरु करण्याची आणि विशेषतः भाड्याने दिलेल्या जागांवरील पोलिस गस्त वाढवण्याची मागणी केली होती. स्थानिक रहिवाशांना असा विश्वास आहे की कायदा अंमलबजावणी संस्थांनी तपास प्रक्रियेला अधिक मजबूत बनवले पाहिजे आणि प्रत्येक रहिवाशाला जबाबदार धरले पाहिजे.

पोलिस विभागाने सध्या गस्त वाढवली असून, पंचायत प्रशासनाच्या समन्वयाने भाडेकरूंच्या पडताळणी मोहिमा राबवण्यात येत आहेत. अधिकाऱ्यांनी घरमालकांना भाडेकरूंच्या माहितीची नेमकी माहिती देण्याचे आवाहन केले आहे. घटनेचा तपास सुरू असताना, स्थानिक रहिवाशांना अपेक्षा आहे की यामुळे सुरक्षिततेच्या उपाययोजना अधिक सक्रियपणे राबवता येतील आणि गावातील लोकांचा विश्वास पुन्हा एकदा स्थिर होईल.

# शाळेतील स्टेशनरी विक्री बंद करण्याची मागणी



■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १४ :** गोव्यातील पुस्तक विक्रेत्यांनी मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांना एका पत्राद्वारे शाळांमध्ये स्टेशनरी आणि नोटबुक विक्रीवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली आहे. शाळांच्या परिसरात स्टेशनरी विक्रीची सुरुवात करून काही शाळा व्यवसायात व्यस्त झाल्या आहेत, ज्यामुळे स्थानिक विक्रेत्यांचा व्यवसाय धोक्यात येत आहे असे या विक्रेत्यांचे म्हणणे आहे.

गोवा पुस्तक विक्रेते संघटनेने मुख्यमंत्री कार्यालयात एक निवेदन सादर केले आहे, ज्यामध्ये शाळांनी शाळेतील विक्रेत्यांकडून स्टेशनरी आणि नोटबुक खरेदी करणे बंधनकारक केले आहे, असे सांगितले आहे. संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत पंडित यांनी याचिकेत म्हटले आहे की, अनेक शाळा त्यांच्या परिसरात व्यावसायिक क्रियाकलाप करत आहेत, ज्यामुळे त्यांचा व्यवसाय धोक्यात आला आहे. काही शाळांनी विद्यार्थ्यांना महागडे दर वसूल करण्यासाठी त्यांच्या कर्मचारी वर्गाला स्टेशनरी विक्रीमध्ये सहभागी करून घेतले आहे.

पंडित यांनी स्पष्ट केले की, या शाळा जीएसटी आणि आयकर विभागात नोंदणीकृत नसून, त्यांचा व्यवसाय नोंदणीशिवाय चालवला जात आहे, ज्यामुळे स्थानिक पुस्तक विक्रेत्यांना मोठे आर्थिक नुकसान होऊ लागले आहे. आम्हाला हे लक्षात आणून देणे गरजेचे आहे की शाळेतील स्टेशनरी विक्रीमुळे आमच्या व्यवसायावर गंभीर परिणाम होत आहेत, असे पंडित यांनी सांगितले.

गोवा पुस्तक विक्रेते संघटनेने मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्याकडे मागणी केली आहे की, या पद्धतींवर तात्काळ कारवाई केली जावी. तसेच, शाळांनी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही स्वरूपात पायाभूत सुविधा शुल्क वसूल करण्यास प्रतिबंध घालण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या मागील निर्देशांचे पालन करण्याची अपेक्षा आहे.

दक्षिण गोव्यातील एका पुस्तक विक्रेत्याने सांगितले की, शाळांचे व्यवस्थापन वर्षाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांना सवलती आणि प्रोत्साहन देणाऱ्या विक्रेत्यांशी संपर्क साधते, ज्यामुळे स्थानिक विक्रेत्यांना तोटा होतो. शाळांना शिक्षणावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे, परंतु काही शाळा आता व्यवसायात गुंतल्या आहेत, असे ते म्हणाले. पुस्तक विक्रेत्यांना आशा आहे की मुख्यमंत्री या प्रकरणात हस्तक्षेप करतील आणि शाळांवर लक्ष केंद्रित करून त्यांच्या कार्यप्रणालीत सुधारणा घडवून आणतील.

# अग्निशमन दल कर्मचाऱ्यांना जोखीम भत्ता मिळणार

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १४ :** राज्यातील अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांना अग्नि जोखीम भत्ता देण्याच्या दीर्घकालीन मागणीची गंभीर दखल घेतली जात असून, यासंदर्भात राज्य सरकार सकारात्मक विचार करत आहे, अशी माहिती मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी दिली.

राष्ट्रीय अग्निशमन सेवा दिनानिमित्त पणजीतील अग्निशमन प्रशिक्षण मैदानावर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या आर्थिक वर्षापासून भत्ता लागू करण्याच्या दृष्टीने प्रक्रिया सुरू असून, या मागणीचा राज्य सरकार गांभीर्याने विचार करत आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमादरम्यान मुख्यमंत्री सावंत यांनी राज्यातील आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रातील प्रगतीबाबतही माहिती दिली. केंद्र सरकारच्या आर्थिक मदतीने गोव्यात ११ बहुउद्देशीय चक्रीवादळ निवारा केंद्रे उभारण्यात येत असून, या उपक्रमात गोवा हे देशातील पहिले राज्य ठरत आहे,असे सांगताना त्यांनी या प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून ३४० कोटी रुपयांचे आर्थिक सहाय्य प्राप्त झाल्याचेही नमूद केले.

सध्या अग्निशमन व आपत्कालीन सेवांच्या ताफ्यात ४० तात्पुरती शमन केंद्रे कार्यरत असून, भविष्यात ही केंद्रे आपत्ती व्यवस्थापनात महत्त्वाची भूमिका बजावतील, असा विश्वासही मुख्यमंत्री सावंत यांनी व्यक्त केला. राज्यातील अग्निशमन दलाच्या सेवेचे कौतुक करताना त्यांनी सांगितले की, गेल्या वर्षभरात विभागाने सुमारे ४४ कोटी रुपयांची मालमत्ता वाचवली असून, विविध अपघात व आगीच्या घटनांमध्ये ३९८ नागरिकांचे प्राण वाचवण्यात आले आहेत. मुख्यमंत्री सावंत यांनी राज्यातील औद्योगिक आस्थापनांना अग्निसुरक्षेसंदर्भातील आवश्यक नियमांचे पालन करून संबंधित प्रमाणपत्रे प्राप्त करण्याचे आवाहन केले. ही प्रक्रिया त्रासदायक वाटू न देता, सुरक्षा उपाययोजना म्हणून पाहणे गरजेचे आहे, असे त्यांनी नमूद केले.आपत्कालीन सेवा अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने राज्यभरात 'आपदा मित्र' व 'आपदा सखी' म्हणून स्वयंसेवकांची फळी उभारण्यात आली असून, आतापर्यंत ३५० स्वयंसेवकांना प्रशिक्षण देण्यात आले असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

# मोपा विमानतळावर ब्लू कॅप टॅक्सी काउंटर बंद करण्याची नोटीस

■ टीम दैनिक हेराल्ड



**पेडणे, दि. १४ :** मोपा आंतरराष्ट्रीय विमानतळावरील 'ब्लू कॅप टॅक्सी काउंटर'ला सुरक्षा मंजुरी प्राप्त न झाल्याने जीएमआर कंपनीने काउंटर बंद करण्याची नोटीस जारी केली आहे. ही कारवाई १५ एप्रिलपासून लागू होणार असून, त्याबाबतची माहिती स्थानिक पोलीस ठाण्यासही देण्यात आली आहे, जेणेकरून कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवल्यास तत्काळ कारवाई करता येईल.

गेल्या वर्षभरापासून स्थानिक भूमिपुत्र टॅक्सी व्यावसायिक मोपा विमानतळावर हक्काचे टॅक्सी काउंटर मिळावे यासाठी आंदोलने करत होते. सरकारकडे वेळोवेळी निवेदने सादर केल्यानंतर, सुमारे सहा महिन्यांपूर्वी विमानतळावर 'ब्लू कॅप' टॅक्सी काउंटर स्थापन करण्यात आला होता. यामुळे स्थानिक व्यावसायिकांत समाधान व्यक्त झाले होते. मात्र, सध्या सुरक्षा मंजुरीच्या अभावामुळे हा काउंटर बंद करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे.

संघटनेच्या प्रतिनिधींनी सांगितले की, ही बाब आम्ही सर्व व्यावसायिकांपर्यंत पोहोचवली आहे. चर्चेला सुरुवात झाली असून, लवकरच यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाईल. आम्ही नियमानुसार ठेवी वेळेवर भरतो. तरीही केवळ सुरक्षा मंजुरी न मिळाल्याने काउंटर बंद करण्याची नोटीस मिळाल्याचे खेदजनक आहे.

मोपा विमानतळ हे गोव्यातील एक महत्त्वाचे प्रकल्प असून, पेडणे तालुक्यातील अनेकांच्या जमिनी या प्रकल्पासाठी घेण्यात आल्या. मात्र, अनेकांना अद्याप योग्य मोबदला मिळालेला नाही. रोजगाराच्या संधीही मर्यादित असल्याने स्थानिक भूमिपुत्रांना व्यवसायाच्या माध्यमातून आत्मनिर्भर होण्याचा प्रयत्न करावा लागत आहे. त्यातही अडथळे येत असल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. स्थानिक प्रतिनिधींनी सरकारकडे मागणी केली आहे की, मोपा विमानतळावर व्यवसाय करणाऱ्या भूमिपुत्रांवर अन्याय होत असेल, तर त्यांच्या हितासाठी तातडीने हस्तक्षेप करून न्याय द्यावा.